नगर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.,(मल्टीस्टेट शेड्यूल्ड) अहमदनगर
अवसायनांतर्गत
बँक रोड,पोस्ट बॉक्स नंबर-७, अहमदनगर-४१४००१(महाराष्ट्र)
फोन:-०२४१-२३४३६४१,२३४३६४२,२४१७८०४-०७

# जाहीर सूचना

१) सर्व ठेवीदार, कर्जदार व ग्राहकांना कळविण्यात येते की, नगर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. अवसायनात गेल्यामुळे भाडेतत्त्वावर घेतलेल्या खाली दिलेल्या तक्त्यातील शाखा बंद करण्याचा निर्णय घेतला आहे.

| बंद होणाऱ्या शाखेचे नाव | शाखेचा पत्ता | शाखा बंद होण्याची दिनांक | शाखा बंद झाल्यानंतर खालील शाखेतून सेवा मिळेल |
|---|---|---|---|
| सावेडी | सुमती श्रुती, डॉ.झेंडे बिल्डिंग, भुतकरवाडी, ता. जि.अहमदनगर | ०४/०४/२०२४ | मुख्य शाखा अहमदनगर |
| काष्टी | काष्टी, ता.श्रीगोंदा, जि. अहमदनगर - ४१४७०१ | ०६/०४/२०२४ | श्रीगोंदा शाखा |
| कर्जत | ८२०, बाजारपेठ, ता.कर्जत, जि. अहमदनगर ४१४७०२ | ०८/०४/२०२४ | मिरजगाव शाखा |
| टाकळी मानूर | बाजारपेठ, टाकळी मानुर, ता.पाथर्डी, जि.अहमदनगर | १०/०४/२०२४ | पाथर्डी शाखा |
| राहुरी | नगर मनमाड रोड, ता. राहुरी, जि. अहमदनगर ४१३७०५ | १५/०४/२०२४ | कोल्हार शाखा |
| सोनगाव | बाजारपेठ, सोनगाव, ता. राहुरी, जि.अहमदनगर ४१३७११ | ०३/०५/२०२४ | आश्वी शाखा |
| सोनई | सोनई घोडेगाव रोड, स्टॅन्ड जवळ, सोनई, ता.नेवासा, जि.अहमदनगर ४१४१०५ | ०९/०५/२०२४ | वांबोरी शाखा |
| राहाता | नगर मनमाड रोड, राहाता, ता.राहाता, जि.अहमदनगर ४२३१०७ | १५/०५/२०२४ | कोल्हार शाखा |

२) सर्व लॉकरधारकांना कळविण्यात येते की, त्यांनी त्वरित आपले लॉकर समर्पण करण्याची व्यवस्था करावी. दि.१०/०३/२०२४ पूर्वी आपले सामान /मौल्यवान वस्तू आपल्या ताब्यात घेऊन खुल्या लॉकरची चावी बँकेत सुपूर्त करून सहकार्य करावे. लॉकर वेळेत बंद न झाल्यास बँकेच्या नियमानुसार पुढील योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

३) शाखेतील सर्व थकीत कर्जदार व जामीनदार यांना सुचित करण्यात येते की, आपल्या कर्ज खात्याची बाकी रक्कम भरून बँकेत सहकार्य करावे. अन्यथा वृत्तपत्र व बँकेची अधिकृत वेबसाईट www.nucb.in संपूर्ण नाव व फोटो सहित थकबाकीदारांची यादी प्रसिद्ध केली जाईल. तसेच संबंधित कर्जदार व जामीनदार यांचे विरुद्ध पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

४) रुपये पाच लाखाच्या आतील सर्व खातेदार / ठेवीदार यांना कळविण्यात येते की, ज्यांनी अद्याप DICGC मार्फत दावे अर्ज भरून दिलेले नाहीत, त्यांनी त्वरित बँकेच्या जवळच्या शाखेत जाऊन रीतसर दावे अर्ज (Claim Form) भरून देणे आवश्यक आहे. तसेच आपल्या बँक खात्यांची केवायसी (KYC) पूर्तता करून घेण्यात यावी.

५) खातेदार ठेवीदारांसाठी सूचना - अ) दावे अर्ज (Claim Form) सादर करताना खात्याच्या मूळ ठेव पावत्या, पासबुक सोबत ठेवावे.

ब) केवायसाठी (KYC) आधार कार्ड, पॅनकार्डची स्वतः प्रमाणित केलेली प्रत आणावी.

क) सहज संपर्कासाठी मोबाईल नंबर / लँडलाईन नंबरची नोंद करावी.

ड) दावा अर्जाची रक्कम खात्यात जमा होण्यासाठी समोरच्या बँकेचे पासबुक / कॅन्सल चेक देणे बंधनकारक आहे.

अधिक माहितीसाठी बँकेची अधिकृत वेबसाईट www.nucb.in वर तसेच संबंधित शाखेतील शाखाधिकारी / अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.

अवसायक
नगर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.
(मल्टीस्टेट शेड्यूल्ड),अहमदनगर - अवसायनांतर्गत

दिनांक:२८/०२/२०२४